जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा
समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
☎ : (०२०) २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.
संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.

❖ वर्ष ४८ वे ❖ अंक ५ वा ❖ जानेवारी २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३

या अंकात — पान नं.


- जिनेश्वरी - अध्याय ८ : कपिल केवली १५
- नव वर्ष में नए संकल्प २१
- चिंतन मोती २४, ५१
- यारी दोस्ती ( Friend Ship ) २५
- कव्हर तपशील ३२
- आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटर - अहमदनगर ४१
- मृत्यु को महोत्सव बनाएँ- मरण है मीठा ४६
- आत्म विजय में हो पुरुषार्थ ४९
- श्रेष्ठता का विकास हो ५२
- उतार चढाव ने समझ ५४
- आपकी सफलता १००% आपके हाथ ५७
- श्रेष्ठ क्षण की पहचान ७३
- घरातील ज्येष्ठ व इतर व्यक्ति ७५
- गोल्डन डायरी ७६
- प्रेम परमात्मा है ७८
- वृत्तपत्रात बांधल्यास खाद्यपदार्थ हानीकारक ७९
- मुन्नाभाई, लगे रहो लगन से ८१
- हास्य जागृति ८२
- बिना दवा मधुमेह का प्रभावशाली उपचार ८३
- नीतिवाक्यामृत आणि आजचे राजकारणी ८९
- कोण आम्हांला टार्गेट करतय ? ९०
- युवा पिढी के साथ सामंज्यस पूर्ण सम्बधों के संभावित नवयुग का सूत्रपात ९२
- खतरनाक है ॲल्युमिनियम के बर्तन ९३
- सुवासित ९५
- मुनोत-जैन शुभविवाह, लासुर स्टेशन १०८ मोफत घरे वाटप १०३
- जयराज ग्रुप, पुणे - हॉस्पिटल उद्‌घाटन १०४
- निलया ग्रुप, पुणे १०५
- अरिहंत जागृति मंच, पुणे १०७
- सुर्यदत्ता इन्स्टिट्यूट, पुणे १०८
- श्री. निशाद शहा - राष्ट्रीय पुरस्कार १०९
- श्री. स्वप्नील गुगळे - नॅशनल रेकॉर्ड १०९

● अर्हम विज्जा, जैनिझम क्लास १११
● जैन श्रावक संघ, जालना १११
● अहमदनगर मर्चन्ट बँक, पुरस्कार ११२
● जैन सोशल ग्रुप, पुणे मिड टाऊन ११२
● जैन एज्युकेशन इन्स्टिट्यूट अधिवेशन चांदवड ११३
● श्री राजीव जैन गुप्तचर ब्युरो प्रमुख ११५
● पूना मर्चन्ट चेंबर – कॅशलेसचे मार्गदर्शन ११६
● डॉ. अभिषेक सोनी, पुणे – पुरस्कार ११७
● श्री. सुवालालजी बाफना ८० वा वाढदिवस १२०
● चौबीस तीर्थंकर चरित्र – खुली किताब परीक्षा १२१
● जैन कॉन्फरन्स मेगा ब्लड डोनेशन कॅम्प १२३
● सॉलीटेअर वर्ल्ड, पुणे – भूमिपजन १२५
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकीय बातम्या



जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

❖ पंचवार्षिक वर्गणी –२२०० रु. ❖ त्रिवार्षिक वर्गणी – १३५० रु.

❖ वार्षिक वर्गणी – ५०० रु. ❖ या अंकाची किंमत ५० रुपये.

❖ वर्गणी व जाहिरात रोखीने/On line/RTGS/AT PAR चेक/पुणे चेकने/मनीऑर्डर/ड्राफ्टने/'जैन जागृति' नावाने पाठवावी.

● www.jainjagruti.in ● www.facebook.com/jainjagrutimagazine

हे पत्रक संपादक, प्रकाशक, मुद्रक व मालक श्री. संजय कांतीलाल चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, पर्वती, पुणे ९ येथे छापून ६२, ऋतुराज सोसायटी, पुणे ३७ येथे प्रसिद्ध केले. लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवायीसाठी पुणे न्यायालय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.



# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA
Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146
IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९११, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**


## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- ❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
- ❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- ❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- ❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- ❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- ❖ **सदाशिव पेठ, परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- ❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- ❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- ❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- ❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
- ❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- ❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- ❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- ❖ **घोडनदी, जि. पुणे –** श्री. पारसमलजी बांठिया, मो. : ९२२५५४२४०६
- ❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- ❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- ❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१
- ❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- ❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
- ❖ **धनसोली, नवी मुंबई –** श्री. सुभाष केशरचंदजी गादिया, मो. ९१५८८८८६८५
- ❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
- ❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- ❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- ❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- ❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- ❖ **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ९३२६३२५३४७
- ❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- ❖ **अंमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- ❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- ❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- ❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- ❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- ❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- ❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३
- ❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय ८ - कपिल केवली

**कपिलची मातृभक्ती**

या अध्यायात सुरुवात मातृभक्तीने होते आणि समापन आत्मभक्तीने होते खूपच हृदयस्पर्शी कथा आहे.

कौशंबी नगरीत एक कपिल नावाचा छोटा मुलगा होता. त्या नगरीत उत्सव-सण साजरे होत होते, सर्व नागरिक आनंदात होते. मिरवणूक उत्साहात चालली होती. हत्तीवर अंबारीत एक ब्राम्हण बसलेला होता. जसजशी ती मिरवणूक कपिलच्या घरावरून जाऊ लागली तशी कपिलची आई रडू लागली. आईचे अश्रु बघून कपिलचे कोवळे हृदय गहिवरले त्याने आईला विचारले, ''आई तू का रडतेस ?''आईने सांगितले ''बाळा ! आज ज्या हत्तीवर तो ब्राम्हण बसलेला आहे ना, कधी काळी तुझे वडील बसत असत. ही मिरवणूक हा राजेशाही थाट बघून माझ्या मनाला वेदना झाली. तू जर शिकून समर्थ झाला असता तर तू सुध्दा अशा हत्तीच्या अंबारीवर बसला असता. ते जुने वैभव आणि जुन्या आठवणी आठवून मला रडू कोसळले.'' त्या क्षणीच त्या मुलाने आईला नमस्कार केला आणि संकल्प सोडत म्हणाला, ''आई तू रडू नकोस मला सर्व सहन होऊ शकते पण तुझे अश्रु मला बघवत नाही. बघ आज मी तुला वचन देतो मी नक्की शिकेन, तुझी इच्छा पूर्ण करेन, वडिलांची जागा पुन्हा प्राप्त करेन.''

भगवंत म्हणतात, भाविकांनो ! ज्याला मातेचे अश्रु कळले त्याला सर्व काही कळले. ज्याला आईच्या अश्रुंनी भिजवले तो सिध्द होतो. ज्याला आईचे अश्रु भिजवू शकत नाही, तो कोणतीही परिस्थिती पचवू शकत नाही आणि शिखरापर्यंत पोहचूही शकत नाही. रस्त्यावर ठेचाळत राहतो, रखडत-अडखतच जगतो.

आईने आपल्या बाळाचे शब्द ऐकले त्याला उराशी धरले व सांगितले ''बाळा तुला येथे कोणी शिकवणार नाही. तुझ्या वडिलांचे मित्र श्रावस्ती नगरीत आहेत, तू त्यांच्याकडे जा ते तुला नक्कीच शिकवतील.'' कपिल त्वरित निघाला श्रावस्ती नगरीत इंद्रदत्त ब्राम्हणाकडे गेला. त्याने त्यांना आपली संपूर्ण हकिकत सांगितली. वडीलांची ओळख दिली. त्या ब्राम्हणाने त्याला सांगितले. ''बेटा ! तू मला माझ्या मुलासारखा आहे. मी तुला नक्की शिकवितो. फक्त तुझ्या राहण्याची व भोजनाची सोय माझ्याकडे मी करू शकत नाही माझ्या मित्रांकडे करतो.'' म्हणून धन्नाश्रेष्ठी कडे त्याची व्यवस्था केली.

**दासी प्रेमात अंध कपिल**

धन्नाश्रेष्ठी श्रीमंत व्यक्ती होते. त्यांच्याकडे पुष्कळ दासी होत्या. त्यातील एक तरूण दासी कपिलच्या सेवेत होती. तिचा स्वभाव मधुरभाषी होता. गोड स्वभावाची ती होती. जेवण वाढता-वाढता ती प्रेमाचे खेळ खेळू लागली. दोघांचे सूत चांगलेच जुळले. एके दिवशी ती कपिलपाशी येऊन त्याला म्हणाली, ''आता आम्हां दासींचा सण येत आहे, सर्व दासींना त्यांचे प्रियकर दाग-दागिने आणून देतील आणि माझे प्रियकर तर तुम्हींच आहात पण तुमच्याजवळ तर काहीच नाही. मग मी उत्सवात कशी सहभागी होऊ ?'' कपिलचा चेहरा उतरला. दासी म्हणाली, ''दुःखी होऊ

नका, तुमचे नैराश्य बघून मला रडू कोसळते. तुम्ही एक काम करा. येथे एक श्रीमंत श्रेष्ठी राहतात. ब्राह्ममुहूर्ताला जो कोणी सर्वात आधी त्याला मंगल शब्द ऐकवतो, शुभेच्छा देतो त्याला तो एक मासा सुवर्ण, दोन मासा सुवर्ण देतो. तुम्ही सर्वांत अगोदर जा तुम्हाला २ मासा सुवर्ण मिळेल आणि त्या पैशाने माझा सण साजरा होईल, ''ही जीवनाची व्यथा आहे की जो स्त्रीचा गुलाम होतो त्याला दिवस-रात्रीतील फरकच समजत नाही. कपिलचे चित्त त्या वित्त प्राप्तीसाठी व्याकूळ झाले होते. त्याला काळवेळेचे भानच राहिले नाही. माझ्या आधी कोणी पोहचायला नको म्हणून अर्धरात्रीच निघाला. सुरक्षा सैनिक त्याला चोर समजून पकडतात. तो विनवण्या करतो. ''मी चोर नाही मी तिकडे सोने घ्यावयास जात होतो'' पण सैनिक विश्वास ठेवत नाहीत. त्याला धरून घेऊन जातात, आणि दुसऱ्या दिवशी प्रसेनजित राजाच्या दरबारी त्याला हजर करतात रात्रभर विचाराचे काहूर मनात पेटते. कोठे आपण आईची इच्छा पूर्ण करावयास आलो होतो आणि दासीच्या इच्छेमुळे कुठे फसलो, तुरूंगात डांबला गेला. आईची इच्छा पूर्ण करायला गेला तर इंद्रदत्ताची आज्ञा आणि आशीर्वाद मिळाले आणि दासीची इच्छापूर्ती करायला गेलो तर सैनिकांची आज्ञा आणि करावास मिळाला.

**मागण्यापूर्वी विचार करा**

कपिल राजासमोर हजर झाला....राजाने प्रश्न विचारले व त्याने सर्व खरी हकिकत सांगून टाकली ''मी चोर नाही...'' राजा त्याच्या निष्पापतेवर प्रसन्न झाला. आणि म्हणाला, ''मी तुझ्यावर खुश आहे तुला जे पाहिजे ते मागुन घे. मी द्यायला तयार आहे.'' तो काय उत्तर देतो त्या आधी बंधूंनो मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. तुम्ही मागण्यापूर्वी विचार करता की देण्यापूर्वी? बंधूंनों ! निर्वाण कल्याणकाच्या उपदेशातील एक अमृत वाक्य बरोबर घेऊन जा देण्यापूर्वी विचार करू नका आणि विचार केल्याशिवायकधीच मागू नका. मागण्यापूर्वी जो विचार करतो तो देव होतो आणि न विचार करता देतो तो ही देवच होतो. आपण काय देतो हे मोलाचे नाही, मोजून-मापून देऊ नका, विचार करून देऊ नका. खिशात हात घाला, हाती जेवढे येईल तेवढे देऊन टाका. मोजून देणारा वाणी असतो दानी नव्हे. अगणित देणारादानी असतो. पूर्वी घराघरात रहाटगाडगे असायचे. विहीरीवर ते चालवायचे. रहाटाचा आवाज किती व्हायचा ? आवाज जास्त पाणी कमी. ढगांची एक गर्जना होते आणि मुसळधार पाणी बरसते. रहाटगाडगे बनून दान देऊ नका, दान करायचे असेल तर मेघांसारखे बरसा विचार न करता दानाचा वर्षाव केला तर मेघाची उपमा मिळेल, नाही तर रहाटगाडग्यांची बरोबरी होईल. कपिल मेघांशी बरोबरी करीत होता. मागण्यापूर्वी विचार करीत होता.. आणि विचार करता-करता गत जन्मापर्यंत पोहचून गेला.

**गतजन्मींच्या ऋषि जीवनाचे स्मरण**

कपिलने विचार करण्यापूर्वी वेळ मागून घेतला. विचार केला की काय मागायचे ? राजाने तर वर दिला की जे तुझ्या तोंडातून निघेल ते देण्यास मी तयार आहे. दोन मांस सुवर्ण, चार, सोळा, चौसष्ठ असे करत-करत अर्धे राज्य मागून घ्यावे, त्याने काय होईल ? पूर्ण राज्य मागून घ्यावे पण शेजाऱ्याचे काय करावे ? आणि अचानक शक्तीला जोरदार झटकाच बसतो. दोन मासे सोन्यासाठी निघाला आणि संपूर्ण राज्य मिळाले तरी तृप्तीचा अनुभव होत नाही. असे कसे हे मन अतृप्त आहे ! किती हा खळगा मोठा की जो भरतच नाही. आणि त्या अतृप्त मनाचे निरीक्षण करता-करता त्यांच्यातील गतजन्मींचा राजकुमार जागृत झाला. मागील जन्मातील ऋषी-महर्षि दिसू लागले. मी मागच्या जन्मी साधना केली होती. आणि मी एकटा साधनेत नव्हतो माझ्या ५०० साथीदारांनीही संन्यास घेतला होता. आणि तो त्या सखोल आठवणीत बुडू लागला. अगदी तळाशी गेला आणि दिव्य ज्ञानाची प्राप्ती, साक्षात्कार झाला.

त्याने कैवल्य प्राप्त केले, त्याचबरोबर गतजन्मींच्या ५०० मित्रांची आठवण झाली कारण त्या जन्मात त्यांनी प्रण घेतला होता. सामूहीक संकल्प केला होता की भविष्यात आपल्यापैकी जो कोणी भगवत् सत्तेला प्रथमत: प्राप्त करेल त्याने उरलेल्या मित्रांना ते वरदान-पसायदान देण्यास नक्की यावे.

आपण सर्व कपिलचा आदि आणि सर्वमान जीवन पट ऐकत आहोत. वाचतांना संकल्प करूया आपणही इतके एकत्र आलो आहोत. कुणास ठाऊक कोण भविष्यात दैवत्व प्राप्त करेल परंतु भगवंताला साक्षी ठेवून आपण एकमेकांशी आत्मीय संबंध, एक नाते बनवू या की भविष्यात ज्याला दैवत्व-जिनत्व प्राप्त होईल त्यांनी एकमेकांना जागृत करण्यासाठी, सांभाळण्यासाठी यावे.

कपिल ने आपल्या दिव्य ज्ञानात पाहिले की मी तर संकल्प केला होता आणि आता ते ५०० सोबती एका जातीचे चोर बनून जीवन कंठीत आहेत. राजगृहाच्या रस्त्यावरून कपिलचे चरण वळले त्या चोरांच्या वस्तीकडे, त्यांचे आचरण बदलण्यासाठी त्यांनाही दैवत्वाचा अनुभव अनुभूत करावयाचा होता. वचनपूर्ती करून वचनाने त्यांना वाचवायचे होते. ते चोरांच्या वस्तीजवळ पोहोचले. चोऱ्यांच्या टोळीने त्यांना घेरले व आपल्या सरदारासमारे हजर केले, सरदाराने पाहिले की ह्या माणसाजवळ तर काहीच नाही पण मग तू एक काम कर एक गीत ऐकव ... कपिल ने जे गीत गायले तो आहे हा आठवा अध्याय. आणि ते गायन ऐकता ऐकता ते चोर साधू बनले, हा आठव्या अध्यायाचा महिमा आहे. ज्या घरात, दुकानात चोरी होत असेल या अध्यायाचे मंगल स्वर तिथे गायले गेले तर चोऱ्या बंद होणार हे नक्की, हे अनुभवसिध्द.

आठव्या अध्यायाचे पारायण केले तर चोराच्या मनातही नारायण निर्माण होतो, चोर साधू बनतो. घरात चोरी होत असेल तर प्रयोग करून पहावा. इंदोरमधील एक बहिणीने भगवंताची आज्ञा घेऊन 'इच्छा कारेणं संदिसह भगवं' उच्चारण करून कपिल चे स्मरण केले ''णमो कपिलस्सं'' चा उद्घोष केला आणि सांगितले 'भगवंता, तुमचे गायन ऐकता-ऐकता ५०० चोर सिध्दत्वास प्राप्त झाले. तसे माझ्या घरात जो कोणी चौर्यकर्म करीत आहे, त्याची वृत्ती बदलून जावो. त्यांनी दृढ श्रध्देने पारायण सुरू केले आणि दुसऱ्याच दिवशी घरातील चोऱ्या थांबल्या.

मी हे तुम्हांस का सांगत आहे ? कारण मी तुम्हाला समजवू इच्छितो की श्रीमद् उतराध्ययन सूत्र हे जीवनातील प्रत्येक समस्यांचे समाधान सूत्र आहे. आराधना करण्याच्या काळात आपण प्रयोग करून पाहू शकता. ग्रहण करू शकता.

दुर्गतीला सुगति बनविण्याची सुत्रे

अधुवे असासयंमि, संसारंमि दुक्खपउराए ।

किं नाम होज्ज तं कम्मयं, जेणाहं दुग्गइं न गच्छेज्जा ।।

कपिलमुनिंनी भावपूर्ण पसायदान देण्यास प्रारंभ करताच चोर दलाची सुगतीची जिज्ञासा निर्माण होऊ लागली व त्यांनी प्रश्न विचारला. ''संपूर्ण संसार अपूर्ण आहे, केव्हा त्यांची सांगता होईल-ते पूर्ण होईल सांगता येत नाही. मग अशा दु:खमय संसारात असे कोणते कर्म, अशी कोणती क्रिया आहे, असे कोणते आचरण आहे की जे केल्यानंतर मी दुर्गती मध्ये जाणार नाही?'' ह्या प्रश्नाने या अध्यायाची सुरवात होते.

ज्ञान आणि श्रध्देचे समग्र स्वरूप ज्याच्याजवळ आहे सर्व प्राणीमात्राचे हित व कल्याण करण्याचे सामर्थ्य ज्याच्यात आहे असे मोह विरहीत कपिल केवली त्या चोरांना दूर्गतिला सुगति बनविण्याचे सुत्र देत आहेत पसायदान देत आहेत.

सुखभोगाच्या लालसेने, अविचाराने पापकर्म करणारा काम भोगात असा अडकतो जशी श्लेष्मात बसलेली माशी. श्लेष्मात बसणे माशीच्या हातात असते पण त्यातून बाहेर पडणे तिच्या हातात नसते.

बंधूनो, माशीला पाहता तुम्ही कधी लाडूवर बसलेली, कधी जखमेवर भिणभिणणारी. लाडूवर माशी बसते, उडून जाते, परंतु तीच माशी माणसाने थुंकलेल्या कफात किंवा बेडक्यात बसते तेव्हा तिचे पंख त्यात अडकतात. ती उडू शकत नाही.

बंधूंनो मनुष्याच्या जीवनात दुराचरण, वाईटसवयी पापकर्म त्या श्लेष्मा प्रमाणे असतात. भोगलालसेने आसक्त होऊन भोगात अडकणारा, त्यातून बाहेर पडू शकत नाही. त्यात पडण्यापुर्वीच सावरलं तर ज्ञान-दर्शन चारित्र्यरूपी पंख सुरक्षित राहू शकतात.

**नो रक्खीसु गिज्झेज्जा –**

राक्षसी समान नारीमध्ये आसक्त होऊ नये, या श्लोकात नारीला राक्षसी ची उपमा दिली आहे. हा शब्द माता किंवा भगिनीसाठी नाही अशी नारी की जी भोगाची नदी, वासनेची दासी, कामप्रिय आहे. तिचे शरीर राक्षसाचे नाही पण तिच्या अंतरंगातील वासना तिला राक्षसी बनवितात. अशी स्त्री वासनेचा उपयोग करून पुरूषांना गुलाम बनविते.

कपिल मुनी त्यांच्या गत जीवनातील अनुभवाचे बोल सांगत आहेत. भोगाची पुतळी असलेल्या स्त्रीशी सख्य कराल तर स्वामी स्वामी करता करता ती तुम्हाला कधी गुलाम बनवेल तुम्हाला समजणार ही नाही. स्त्री असो वा पुरूष असो जेव्हा जेव्हा वासनेच्या आधारावर, वासनेचा उपयोग करून नाते जोपासले जाते तेव्हा ते राक्षसी बनते, नरकात नेते.

कपिल मुनि संयम, साधनेच्या आधारावर संकल्पबध्द करू पहात आहे. 'कोणाच्या वासनेची शिकार बनू नका, वासनेने कोणाशी शिकार ही करु नका तरच सुगति शक्य आहे.'

मुक समर्थनामुळेच विपरीत व्यवस्थेला खतपाणी

कपिल मुनि चोरांच्या अंतरंगातील स्तेनवृत्तीवर प्रहार करीत, त्यांच्यातील संतवृत्तीला जागृत करण्या हेतू सांगत आहे. – जे प्राण वधाची अनुमोदना करतात. जे हिंसेचे अनुमोदन करतात ते दु:खातून मुक्त होऊ शकत नाही. हिंसा करणारा, हिंसा करविणाराच दु:खी होतो असं नाही तर हिंसेचा विरोध न करणारा, हिंसेला मूक समर्थन देणाराही दु:खालाच जवळ करतो.

महात्मा गांधीचे असहकार आंदोलन याच तत्वावर आधारीत होते. जे मी करू इच्छित नाही जे मी करीत नाही त्यात माझे समर्थन सहयोग व सहभाग राहणार नाही, या सविनय कायदेभंग अभियानाचे मूळ उद्दिष्ट होते की जी अत्याचाराची, पापाचाराची, अन्यायाची व्यवस्था आहे. त्याचा भंग करणे, त्याला समर्थन न देणे.

दुष्ट व्यवस्था, विकृत व्यवस्था तोपर्यंतच चालते जोपर्यंत तुमचे-आमचे समर्थन त्याला लाभते. जेव्हा हे असे समर्थन देणं आपण बंद करू, दुष्ट व्यवस्था एक क्षणभरही टिकणार नाही. जर ब्रिटिशांना ललकारलं जाऊ शकतं तर समाजातील कुरूढीना दुत्कारलं का नाही जाऊ शकत ?

उदाहरण द्यायचं झालं तर लग्नप्रसंगी होणारे रात्री भोजन म्हणजे असंयमाचा महासागर आहे. लग्नानंतरच्या दुसऱ्या दिवशी सकाळी जर लग्नस्थळी जाऊन पहाल तर लक्षात येईल रात्रीच्या त्या बेभान समयी लोकांनी किती जीवांना पायदळी तुडवलंय, किती अन्न नाल्यातून वाहतयं ! त्या उष्टान्नावर किती कीडे-कीटक बसतायत!

ज्या अन्नाने क्षुधातृप्ती होऊ शकत होती प्रकृती बनू शकत होती त्यातून विकृती निर्माण होते. ही दुष्टतम व्यवस्था आहे. अमानवी व्यवस्था आहे. जोपर्यंत त्याला अनुमोदन आहे तोपर्यंतच तीच जीवन व्यवस्था आहे. अशा पापाचे भागीदार होऊ नका.

जीवनातील एक खूप कटू सत्य आहे सूत्रधारांच्याकडे धर्मसूत्र नाही व ज्यांच्याकडे धर्मसूत्र आहे. त्यांच्याकडे सत्तेचे सूत्र नाही ही शाश्वत विसंगती आहे ज्या दिवशी धर्मसूत्र व सत्तेचं सूत्र एकाच हातात येतील तेव्हा दु:शासन जाऊन सुशासन येईल.

मोक्ष प्राप्तीतच तृप्ती

जे लक्खणं च सुविणं च, अंगविज्जं च जे पउंजंति
न हु ते समणा वुच्चंति, एवं आयरिएहिं अक्खायं ।।

जे लक्षणशास्त्र, स्वप्नशास्त्र,अंग विद्यांचे भौतिक सुखासाठी प्रयोग करतो त्याला श्रमण, संत म्हटले जात नाही. कोणत्याही प्रकारच्या हिंसेचे समर्थन करणारी व्यक्ती कधीही दुःखमुक्त होऊ शकत नाही. भौतिकसुख कितीही मिळाले तरी तृप्ती मिळत नाही कारण आशा - अपेक्षा कधी पूर्णच होत नाही.आपल्या अंतरंगातील तृष्णेची आग, लोभाची इच्छा-वासना त्यात जितके टाकाल ती विझण्याऐवजी जास्त भडकते आगीला विझवण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तुपाची नव्हे, आणि समग्र भौतिक सामग्री निव्वळ तुपाचच काम करते, तृष्णा वाढवण्याचचं काम करते.. त्याला अंत कधी येतच नसतो. व्यक्ती संपते पण तृष्णा संपत नाही याचं हे छान उदाहरण आहे.

एका जमीनदाराने घोषणा केली... सूर्योदयापासून जमीन मोजायची...जेवढी जमीन तुम्ही मापाल तेवढी जमीन तुमची. अट फक्त एवढीच आहे जेथून मोजायला सुरवात कराल तेथे सूर्यास्तापूर्वी पोहोचायचे. अनेक लोक आले पण आजपर्यंत कुणालाही इंचभर जमीन मिळाली नाही कारण ते जमीन मोजायला सुरवात करायचे, सुर्योदयानुसार गणित लावायचे की १२ वाजेपर्यंत आपण मोजू आणि नंतर पुन्हा फिरू....जेवढा यायला वेळ लागेल तितकाच जायलाही लागेल. सूर्य माथ्यावर येईपर्यंत ते जमीन मोजत जात पुढे जाऊन त्यांना दिसे की एक फर्लांगवर ते आंब्यांचे खूप सुंदर झाड आहे ते घेऊन मग माघारी येऊ. आंबे गोळा केले आता परत फिरणार पण समोर एक नारळाचं झाड दृष्टीस पडतो, विचार करतो थोडे नारळ ही बरोबर घेऊ... ओझं एवढं, पाय थकलेले, चालता-चालता सूर्य मावळू लागतो. मग परतीसाठी पळायला सुरवात, ओझं आणि पळणं यामुळे फार दमतो... जास्त दमछाकीमुळे तिथेच श्वास संपतो, व्यक्ती संपून जाते. पण तृष्णा कधी संपत नसते. तृप्ती समाधान - संतोष मिळते केवळ ईश्वरप्राप्तीच्या इच्छाशक्तीनेच. आत्म्यातील अनंत सुख मिळते तेंव्हाच खऱ्या आनंदाची चव कळते. वस्तू पदार्थ वगैरे सुखाभास आहे त्याने तृप्ती मिळूच शकत नाही.

ह्याच दिव्य श्रध्देने ५०० चोर सिध्दीस पोहोचले. कपिलने जे गायन या अध्यायात केले ते इतक्या श्रध्देने आपण करूया. आपल्या अंतरंगात बसलेला चोर, मनात दडलेला चोर, संस्कारात ठसलेला चोर चारित्र्यात उतरलेला चोर, पलायन करण्यास भाग पडेल. चोर संत होईल. सिद्ध होईल, स्तेन वृत्ती संतवृत्ती बनून जाईल. कपिलच्या अध्यायातील हे परमसत्य .. चिरंतन सत्य आपण स्विकारावे, जगावे, जीवनात त्या सत्याचा सुंदर अनुभव घेऊन सत्-चित् आनंद प्राप्त करावा हीच मंगल भावना.... ●


## कोणत्याही प्रसंगी देण्याची मौल्यवान भेट

## 'जैन जागृति' मासिक

**आपले आप्त, स्नेहीजण, मित्र यांना भेट देण्याचा प्रसंग वर्षभरात खूप वेळा येत असतो. अशावेळी जैन जागृतिची वार्षिक / त्रिवार्षिक / पंचवार्षिक वर्गणी भरून आपल्या आवडणाऱ्या व्यक्तीस भेट म्हणून अवश्य द्या. जैन जागृतिचा अंक त्या व्यक्तीस दरमहा मिळत राहील आणि आपली आठवण दरमहा आपल्या आवडत्या व्यक्तीच्या मनात दरवळत राहील.**

**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर**

| | |
|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० |
| त्रिवार्षिक | रु. १३५० |
| वार्षिक | रु. ५०० |

## कव्हर तपशील - जानेवारी २०१७

❖ **आनंदऋषिजी हॉस्पिटल – अहमदनगर**

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अहमदनगर हे हॉस्पिटल अल्प काळात संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेले आहे. या हॉस्पिटलची संपूर्ण माहिती या अंकात पान ४१ वर दिलेली आहे.

❖ **मुनोत–जैन शुभविवाह**

लासूर स्टेशन येथील चि. श्रेया अजयजी मुनोत व औरंगाबाद येथील चि. बादल मनोजकुमारजी जैन यांचा शुभविवाह दि. १२ डिसेंबर रोजी लासूर स्टेशन येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी लग्नाच्या खर्चात फाटा देऊन १०८ गरीबांना मोफत घरे देण्यात आली. या दोन्ही परिवारांनी समाजासमोर एक मोठा आदर्श निर्माण केला आहे.

❖ **सॉलीटेअर वर्ल्ड, पुणे – भूमिपूजन**

बांधकाम व्यवसायातील अग्रेसर चोरडिया ग्रुप व शहा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स तर्फे पुणे शहरात गंगाधाम चौक, बिबवेवाडी येथे सॉलीटेअर वर्ल्ड ही भव्य स्किम १७ एकरमध्ये साकार होत आहे. या प्रॉजेक्टचे भूमिपूजन १८ डिसेंबर २०१६ रोजी श्री. अशोकजी चोरडिया परिवार, श्री. संजयजी शहा परिवार व ५० दाम्पत्यांच्या हस्ते संपन्न झाला.

❖ **श्री. निशाद शहा, पुणे – राष्ट्रीय पुरस्कार**

पुणे येथील श्री. निशाद पोपटलालजी शहा यांना राष्ट्रीय अपंग दिनानिमित्त केंद्रिय सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे ३ डिसेंबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय दिव्यांगजन पुरस्कार राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते देण्यात आला.

❖ **निलया ग्रुप, पुणे**

निलया ग्रुप यांनी सदाशिव पेठ, शनिपार येथे भव्य कॉमर्स एज्युकेशन मॉलची स्थापना केली आहे. याचे उद्घाटन २७ नोव्हेंबर रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. संस्थेचे फाऊंडर C.A. निलय मेहता व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वांचे स्वागत केले. येथे विविध प्रकारचे कोर्स सुरु करण्यात आले आहेत.

❖ **सुर्यदत्ता इन्स्टिट्युट, पुणे**

पुणे – 'सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या 'सूर्यदत्ता इन्स्टिट्यूट ऑफ अँड वेलनेस' तर्फे 'मिसेस इंडिया अर्थ २०१६' विजेत्या प्रिनीत ग्रेवाल यांचा 'मिसेस वर्ल्ड सूर्यदत्ता' बहुमान देऊन ११ डिसेंबर रोजी गौरव करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, सौ. सुषमा चोरडिया व डॉ. दीपक शिकारपूर यांनी प्रिनीत ग्रेवाल यांचा मानपत्र, मानचिन्ह व मुकूट देऊन सत्कार केला.

❖ **डॉ. अभिषेक सोनी, पुणे – पुरस्कार**

पुणे – Famdent Excellence in Dentistry Asard (FEDA) यांच्या तर्फे दर वर्षी देण्यात येणारा SPECIALIST DENTIST OF THE YEAR PEDODONTIST (बाल दंतरोग तज्ञ) हा पुरस्कार या वर्षी पुण्याचे बाल दंतरोग तज्ञ डॉक्टर अभिषेक सोनी यांना मिळाला आहे. तसेच गेल्या वर्षी त्यांचे क्लिनिक Vanilla Smiles Dental Clinic, आपटे रोडला Best Interior of the Clinic Non Metropolitan हा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला होता.

❖ **जैन सोशल ग्रुप पुणे मिड टाऊन**

जैन सोशल ग्रुप पुणे मिड टाऊन तर्फे यावर्षी डिसेंबर महिन्यात समाजातील अत्यंत गरीब आणि गरजवंत, पीडित मुलांसाठी निस्पृहपणे – अविरतपणे

कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थांना, त्यांच्या गरजेनुसार मदत केली. ज्येष्ठ सिने-नाट्य कलाकार नटसम्राट श्रीराम लागू यांचे शुभहस्ते हे मदत कार्य साकार झाले. यावेळी सोबत ग्रुपचे अध्यक्ष श्री. विनोद शहा, सौ. विजया शहा, श्री. शरद शहा इ. मान्यवर.

❖ **श्री. सुवालालजी बाफना – ८० वा वाढदिवस**

श्री. सुवालालजी हस्तीमलजी बाफना यांचे ८० व्या वर्षात पदार्पण निमित्त अभिष्टचिंतन सोहळा, सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा, सोने की सीडी इ. कार्यक्रमाचे आयोजन बाफना परिवारातर्फे ६ डिसेंबर रोजी पुणे येथे करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्री. सुवालालजी व सौ. सायरबाई बाफना यांना शुभेच्छा दिल्या.

❖ **श्री. स्वप्नील गुगळे, पुणे – नॅशनल रेकॉर्ड**

पुणे येथील श्री. स्वप्नील मनसुखजी गुगळे हा महाराष्ट्र रणजी टीमचा २०१६-२०१७ चा कॅप्टन आहे. नुकतेच स्वप्नील गुगळे ३५१* रण व अंकित बावणे २५८* रण या दोघांनी मिळून ५९४ रनांची पार्टनरशिप केली. ५९४ रनाची पार्टनरशिप करुन त्यांनी फर्स्टक्लास क्रिकेटमध्ये सर्वात मोठी पार्टनरशिप करुन नॅशनल रेकॉर्ड बनवला आहे. ●

## वचनामृत

- ❊ यदि समय विचक्षणता नहीं है, तो कोई कला सफल नहीं हो सकती ।
- ❊ ईर्ष्यालु लोगों से संसार भरा पड़ा है ।
- ❊ जिसने ह्रदय में वीतराग को स्थान नहीं दिया, उसका जन्म निष्फल है ।
- ❊ जो समाज शिक्षित होगा, वही आगे कदम उठा सकेगा ।
- ❊ प्रतिष्ठाओं के अवसर पर नवकारसियों की धमाल खड़ी करके धन की बर्बादी करना अनिच्छनीय है।
- ❊ धन की बर्बादी हद्द से अधिक होती है तो सामाजिक जीवन में यह खोखलापन लाती है ।
- ❊ संसार में महान पुण्योदय के बिना मनुष्य जन्म भी नहीं मिलता ।
- ❊ यदि लब्ध मनुष्य जन्म को खो दिया, तो वह फिर लाख प्रयत्न करने पर भी नहीं मिलेगा ।
- ❊ हमें सुकृत कार्य करके मनुष्य जन्म को सफल बनाना चाहिए ।
- ❊ एक मनुष्य गति ही ऐसी है, जिसमें सब प्रकार की धर्मसामग्री सुलभ है।
- ❊ जिस मनुष्य में मनुष्यता है, उसमें सब कुछ है ।
- ❊ स्वार्थ पूरा होने पर कोई किसी की सार-संभाल या पूछ-परख नहीं करता ।
- ❊ जिसने बोलना नहीं सीखा, उसने कुछ नहीं सीखा।
- ❊ संसार में 'सबसे भली चुप' जैसा कोई मंत्र नहीं है।
- ❊ जो हित, मित (अल्प) और मधुर वचन बोलता है, वही अपने को पाप कर्मों से बचा सकता है।
- ❊ हठाग्रह सत्य का विनाशक और असत्य का प्रापक है ।
- ❊ कर्मगति विचित्र है। उसका भोग भुगते बिना छुटकारा नहीं ।
- ❊ अति पाप और अति पुण्य का फल इसी भव में मिलता है।
- ❊ मनुष्यों की रक्षा पूर्वोपार्जित पुण्य ही करता है।
- ❊ मनुष्य की शोभा रुप से नहीं, उत्तम गुणोंसे होती है ।
- ❊ अति सब जगह छोड़ने लायक है ।
- ❊ उत्तम पुरुष अंगीकृत कार्य का त्याग नहीं करते।
- ❊ धर्म से जय और अधर्म से नाश होता है ।
- ❊ अधर्म का सेवन करने से सर्वस्व नाश होता है ●